दै. युवा सकाळ ३/१०/०२

# 'युवा सकाळ'वर शुभेच्छांचा वर्षाव आणि अपेक्षाही









कोल्हापुरातील कमला महाविद्यालयात बुधवारी 'युवा सकाळ'च्या दुसऱ्या वर्धापनदिनानिमित्त परिसंवाद झाला. त्यामध्ये बोलताना अनुक्रमे शीतल होडगे, अनमोली उपाध्ये व सुरेखा तोडकर. समोर उपस्थित विद्यार्थिनी.

**कोल्हापूर, ता. २ :** 'युवा सकाळ'वर शुभेच्छांचा वर्षाव करतानाच त्याच्याकडून असणाऱ्या वाढत्या अपेक्षांची जाणीव आज येथे कमला महाविद्यालयातील परिसंवादात अनेक तरुणींनी करून दिली. महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती, 'युवा सकाळ'चा दुसरा वर्धापनदिन यांचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य क्रांतिकुमार पाटील होते.

'युवा सकाळ'कडून असणाऱ्या अपेक्षा व्यक्त करताना विद्यार्थिनींनी निर्भीडपणे आणि मोजक्या शब्दांत विचार व्यक्त केले. 'युवा सकाळ'ला दुसऱ्या वर्धापनदिनाच्या शुभेच्छा दिल्या. इतर दैनिकांच्या तुलनेत त्याचे वेगळेपण सांगताना 'युवा'तील विविध उपयुक्त सदरांचे विवेचन केले. त्यांचे विचार थोडक्यात असे :

**शीतल होडगे :** सद्य परिस्थितीत युवकांची नीतिमत्ता खालावत आहे. भारतीय संस्कृतीची नव्याने ओळख करून देणारी माहिती 'युवा'मधून द्यावी. राशीभविष्य देण्याऐवजी ती जागा दुसऱ्या लेखनाला द्यावी.

**पूजा जोशी :** 'युवा'मधून पुस्तके व ग्रंथांचा परिचय करून दिला जातो. त्यातून नवीन पुस्तकांची माहिती द्यावी.

**अश्विनी जाखले :** 'युवा'तून स्त्रियांच्या अनेक विषयांना प्राधान्य दिले जाते. त्यामध्ये देश-विदेशातील कर्तृत्ववान महिलांच्या जडणघडणीचे रहस्य सांगणारे लेखन प्रसिद्ध व्हावे.

**निलोफर शेख :** केवळ पदवीधारक होणे आता पुरेसे नाही. त्याला करियरच्या दृष्टीने अधिक काही हवे आहे. त्यामुळे तशा प्रकारचे उपक्रम राबविल्यास ते फायदेशीर ठरेल.

**सुरेखा तोडकर :** आर्थिक विषयांना प्राधान्य द्यावे. बेरोजगारीची समस्या मोठी आहे. तरुणांसाठी शासनाच्या विविध योजना आणि उपक्रम आहेत. त्याविषयी सविस्तर माहिती द्यावी.

**अनमोली उपाध्ये :** मिडिया वॉच वाचनीय असते. रोजगाराच्या संधीविषयी माहिती त्रोटक वाटते. ती अधिक विस्ताराने द्यावी. महिलांना उपयुक्त ठरतील अशा लघु उद्योगांवर माहिती द्यावी.

**अश्विनी वास्के :** इतर प्रांतातील, तसेच परदेशी भाषेचा सहज व सुलभपणे परिचय करून देणारे सदर सुरू करावे.

उद्घाटनपर भाषणात कोल्हापूर 'सकाळ'चे कार्यकारी संपादक मल्हार अरणकल्ले म्हणाले, ''आजच्या स्पर्धेच्या युगात ज्ञानाला फार महत्त्व आले आहे. ज्ञानाची उपासना केली तरच आपण टिकाव धरू शकू. 'युवा'च्या माध्यमातून 'सकाळ'ने ज्ञानाचे नवे दालन खुले केले आहे.''

ते पुढे म्हणाले, ''आजच्या युवतींमध्ये संघर्ष करण्याची क्षमता आहे. त्या आपली कर्तबगारी सिद्ध करू शकतात.''

कार्यक्रमाच्या सुरवातीला श्री. अरणकल्ले यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन करण्यात आले. प्राचार्य क्रांतिकुमार पाटील यांनी ताराराणी विद्यापीठ आणि 'सकाळ' परिवार यांच्यात असलेल्या दीर्घकालीन संबंधाचा परिचय करून दिला. युवा सकाळचे उपसंपादक जयसिंग पाटील यांनी प्रास्ताविक केले. 'सकाळ'चे व्यवस्थापक नंदन मिठारी यांनी आभार मानले. या वेळी परिसंवादात भाग घेणाऱ्या विद्यार्थिनी, संयोजक, प्राध्यापकांना श्री. अरणकल्ले यांच्या हस्ते स्मृतिचिन्हे देण्यात आली. प्राचार्य पाटील यांना स्मृतिचिन्ह, अब्राहम लिंकन यांचे पत्र भेट म्हणून देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व संयोजन अनुक्रमे प्रा. सुजय पाटील व प्रा. नेताजीराव पवार यांनी केले. कार्यक्रमास 'सकाळ' परिवारातील सर्वश्री रवींद्र राऊत, एन. एस. पाटील, गणेश बिदनूर, रवींद्र रायकर, राजन गुणे, महेंद्र कुरुंदकर आदी उपस्थित होते. ■